क्रमांक : नोंदणी-२००७/प्र.क्र.३८९/म-१
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २५ जानेवारी २००८

प्रति,

१) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक

३) सर्व सह जिल्हा निबंधक

४) सर्व सह दुय्यम निबंधक/दुय्यम निबंधक

विषय :- **जमीन-मुंबई शहर**
मुंबई शहर जिल्हयातील भाडेपट्ट्याने दिलेल्या शासकीय भूखंडावरील इमारतीतील सदनिका/गाळे/दुकाने/कार्यालय हे विक्री/हस्तांतरण/भाडेतत्वावर करण्याबाबत.

संदर्भ :- जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे पत्र क्र. सीएसएल आर/आरईक्यी-१/ एलएनडी २६४०(नों)/२००१/११३० दि. १३/३/२००१

नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम २२अ मधील तरतुदीचा वापर करुन शासनाने विशिष्ट दस्तऐवजांची नोंदणी जनहितविरोधी घोषित करुन त्यांच्या नोंदणीस मज्जाव केला होता. मा. सर्वोच्च न्यायालयाने सन २००१ चा दिवाणी दावा क्रमांक ७८०० मध्ये नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम २२अ ची तरतुद घटनाबाह्य ठरविली आहे. त्यामुळे शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.नोंदणी-२००६/प्र.क्र.४१७/म-१ दि.८/११/२००६ अन्वये नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम २२अ नुसार शासनाने काढलेल्या अधिसूचनांचा प्रभाव संपुष्टात आल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे या कलमान्वये कोणत्याही दस्तऐवजाची नोंदणी रोखून धरता येणार नाही. त्या अनुषंगाने कोणत्याही दस्तऐवजाची नोंदणी करतांना केंद्र शासन अथवा राज्य शासन यांच्या एखाद्या कायद्यान्वये बंधन घातले असेल अशाच दस्तऐवजांच्या नोंदणीसाठी ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यात यावे, अन्य दस्तऐवजांची नोंदणी रोखून धरु नये. सर्व संबंधितांनी सदर आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे. जिल्हाधिकारी, मुंबई यांचे दिनांक १३/३/२००१ रोजीच्या संदर्भाधीन पत्रातील सूचनांचे पालन करण्याची आवश्यकता नाही हे स्पष्ट करण्यात येत आहे.

( वा.ना. आभाळे )
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रत/-

जिल्हाधिकारी, मुंबई शहर/मुंबई उपनगर जिल्हा, यांना त्यांच्या संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने दिनांक ८.११.२००६ च्या शासन निर्णयाच्या प्रतीसह माहितीसाठी अग्रेषित.

*Source* : www.apcigroup.in